क्रिकेटपटूंची धाव
क्रीझ से कॅमेरा तक







मॉडेल आणि स्टारपुत्रांनंतर आता प्रसिद्ध क्रिकेट खेळाडूंनीही बॉलीवूडमध्ये प्रवेश करण्याचं ठरवलंय. अजय जाडेजा, विनोद कांबळी आणि मोहिंदर अमरनाथनी काही चित्रपट स्वीकारलेत. अजय जाडेजा पम्मी संधूंच्या तिसऱ्या चित्रपटात रोमॅण्टिक भूमिकेत दिसेल तर सचिन तेंडुलकरचा चांगला मित्र विनोद कांबळी रवी दिवाणच्या *अनर्थ* या चित्रपटात चमकेल. तसंच प्रसिद्ध क्रिकेटर लाला अमरनाथ यांचा पुत्र आणि क्रिकेटमधून बऱ्याच काळापासून निवृत्ती स्वीकारलेल्या मोहिंदर अमरनाथनेही सुनील शेट्टीबरोबर एक चित्रपट स्वीकारलाय. पुढच्या महिन्यापासून हे क्रिकेटर आपापल्या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र होतील. स्पीन गोलंदाजी करणारा अनिल कुंबळे आणि राहुल द्रवीडही दक्षिणेकडील चित्रपटात काम करण्यात रस दाखवत आहेत. पण सतत चालणाऱ्या देश-विदेशातील क्रिकेट सामन्यांमुळे ते चित्रपटांसाठी अधिक वेळ देऊ शकत नाहीत.

तसं पाहिलं तर क्रिकेटच्या मैदानावर चौकार-षटकारांची आतषबाजी करणाऱ्या किंवा भेदक गोलंदाजीने फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवणाऱ्या क्रिकेटपटूंना चित्रपटाच्या मैदानावरील खेळ फारसा जमलेला नाही. पूर्वी इलेक्ट्रॉनिक मीडिया फार सक्रिय नव्हता. पण क्रिकेटर जाहिरातींमध्ये काम करायचे. सर्वप्रथम ऑल राऊंडर खेळाडू सलीम दुराणीने चित्रपटात प्रवेश करून आपलं सिनेप्रेम दाखवून दिलं होतं. त्याने निर्माता-दिग्दर्शक बी. आर. इशारांच्या *चरित्र* या चित्रपटात मुख्य भूमिका केली होती. १९७३मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात त्याची नायिका परवीन बॉबी होती. *चरित्र*मध्ये सलीमला रोमान्स, ॲक्शन आणि इमोशन हे अभिनयातील सारे पैलू दाखवण्याची संधी होती. पण प्रेक्षकांनी त्याला स्वीकारलं नाही. कारण त्यावेळी शशी कपूर, जितेंद्र, राजेश खन्नासारख्या चॉकलेट हिरोंचं साम्राज्य होतं. तर सलीम दुराणी मात्र रफटफ व्यक्तिमत्त्वाचे होते. परवीन बॉबीने मात्र या चित्रपटात अभिनयाची चांगली चुणूक दाखवली होती. *चरित्र* व्यतिरिक्त आणखीही काही चित्रपट सलीमने स्वीकारले होते. पण *चरित्र*ला मिळालेल्या किरकोळ प्रतिसादामुळे सर्व निर्मात्यांनी आपले चित्रपट अर्धवट बंद करणं योग्य समजलं.

त्यानंतर लिटिल मास्टर सुनील मनोहर गावसकरनेही मराठी चित्रपट *सावली प्रेमाची*मध्ये अभिनेत्याची भूमिका केली. पण जगभरातील गोलंदाजांच्या तिखट गोलंदाजीचा चिवट मुकाबला करण्यासाठी प्रसिद्ध असलेला सुनील गावसकर पहिल्याच चित्रपटात क्लीन बोल्ड झाला. मराठी प्रेक्षकांनीही त्याला स्वीकारलं नाही. तरीही डॉ.श्रीराम लागूने स्वतःच्या दिग्दर्शनातील मराठी *झाकोळ*मध्ये महत्त्वाची भूमिका लिटिल मास्टर सुनील

गावसकरला दिली होती. तो चित्रपटही बॉक्स ऑफिसवर अयशस्वी ठरला. मग सुनील गावसकरने पुन्हा क्रिकेट मैदानावर परतण्याचा निर्णय घेतला. कारण त्याला अपयश आवडत नव्हतं. पण निर्माता विपेन के. देवानच्या केवल शर्मा दिग्दर्शित हिंदी चित्रपट *मालामाल*मध्ये सनी पाहुणा कलाकार म्हणून पुन्हा दिसला होता. या चित्रपटात प्रमुख कलाकार होते नसीरुद्दीन शहा, पूनम धिल्लाँ, मंदाकिनी आणि आदित्य पंचोली. हा चित्रपटही बॉक्स ऑफिसवर काही चमत्कार दाखवू शकला नाही. आणि सुनीलने चित्रपटांपासून चार हात दूर राहणंच पसंत केलं. पण त्याच्या फिल्मी मित्रांची संख्या मात्र वाढतच गेली. रेकॉर्डिंग, मुहूर्त, प्रीमियर शोसाठी तो प्रमुख पाहुणा म्हणून दिसायचा.

भारतीय क्रिकेट टीममध्ये जगभरात सर्वश्रेष्ठ ठरलेला बी.एस.चंद्रशेखर जेव्हा मैदानावर गोलंदाजी करायचा तेव्हा भल्याभल्या फलंदाजांची भंबेरी उडायची. कारण तासाभरात संपूर्ण टीमला आपल्या गोलंदाजीने पॅव्हेलियनमध्ये पाठवण्याची किमयाही तो करीत असे. बी.एस.चंद्रशेखर चित्रपटात कधी चमकला नाही. पण तो उत्कृष्ट गायक होता. आजही त्याचं म्हणणं आहे की, त्याच्या नशिबात क्रिकेटपटू होणं नसतं तर निश्चितपणे त्याने चित्रपटांसाठी पार्श्वगायन केलं असतं.

मैदानावरील कठीण आणि तणावग्रस्त परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी तो नेहमी मुकेशची गाणी गायचा आणि त्यानंतरच तो मूडमध्ये गोलंदाजी करून फलंदाजांची दाणादाण उडवायचा.





तसं पाहिलं तर चित्रपट निर्माते-दिग्दर्शकांनाही आपल्या चित्रपटाला प्रसिद्धी मिळावी यासाठी आपल्या चित्रपटात क्रिकेटपटू हवे असतात. १९८३मध्ये भारतीय क्रिकेट टीमने जेव्हा विश्वचषक जिंकले होते तेव्हा कपिलदेव देशभर हिरो ठरला होता. तेव्हा निर्माता के. वोहरा आणि जे. वोहरानी कपिलदेवला आपल्या *क्रिकेटर* या चित्रपटात महत्त्वाची भूमिका दिली होती. या चित्रपटात इंग्लंडचे त्यावेळचे कर्णधार बॉब विलिसचीही एक क्षणिक झलक दिसली होती. त्या चित्रपटात इतर कलाकारांत मार्क झुबेर, दिप्ती नवल आणि सईद जाफरी होते. हा चित्रपटही बॉक्स ऑफिसवर क्लीन बोल्ड झाला होता. त्याचा परिणाम कपिलदेव चित्रपट जगतातून कायमचा आऊट होण्यात झाला. तसंच त्यावेळी आकर्षक रूप आणि देहयष्टी असलेला फलंदाज संदीप पाटीलनेही चित्रपटात प्रवेश केला होता. त्याचा पहिला चित्रपट *कभी अजनबी थे* होता. त्यात त्याची हिरोईन पूनम धिल्लाँ होती. या चित्रपटाचं वैशिष्ट्य म्हणजे त्यात विकेटकीपर सय्यद किरमानीने खलनायकाची भूमिका केली होती. पण हे आघाडीचे क्रिकेटर आणि देखणी पूनम धिल्लाँही या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर टिकवू शकले नाहीत. आणि मग पुन्हा चित्रपटात भूमिका करण्याची हिंमत या दोन्ही क्रिकेटरांना झाली नाही.

भारतीय चित्रपटात पाकिस्तानी गायक आणि अभिनेते असणं काही नवीन नाही. पण भारतीय चित्रपटात चक्क पहिला पाकिस्तानी क्रिकेटरही चमकला. मोहसिन खान त्याचं नाव. मोहसिनने प्रसिद्ध अभिनेत्री रीना रॉयशी लग्न केलं होतं. नंतर काही काळ तो भारतात राहात होता तेव्हा निर्माते अख्तरनी त्याला चित्रपटात चमकण्याची संधी दिली. त्यांनी धर्मेंद्र आणि विनोद खन्ना यांची भूमिका असलेल्या *बटवारा* चित्रपटात मोहसिनला चमकवलं. या चित्रपटात पुन्हा पूनम धिल्लाँला क्रिकेटरची हिरोईन बनण्याची संधी मिळाली होती. *बटवारा*ही बॉक्स ऑफिसवर आपटला. पण रीना रॉयच्या प्रयत्नाने त्याला *साथी, फतेह* व *लाट साहब*सारख्या चित्रपटात चांगली संधी मिळाली. मोहसिन खानचं दुर्भाग्य म्हणजे तो शत्रू देशाचा नागरिक असल्याने त्याला बॉलीवूड सोडावं लागलं. त्यानंतर अधिक काळ भारतीय चित्रपटात काम करण्याचं कुणा क्रिकेटराचं धैर्य झालं नाही. मॉडेलिंगच्या माध्यमाद्वारे सुनील गावसकरपासून सचिन तेंडुलकरपर्यंत आपल्या अभिनयाची हौस भागवत होते.

मैदानात प्रतिस्पर्ध्यांना सळो की पळो करून सोडणारे क्रिकेटर बॉलीवूडमध्ये आपली चमक का दाखवू शकले नाहीत? हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. यासंदर्भात पूनम धिल्लाँ म्हणते, 'हे क्रिकेटर चांगले अभिनेते होते, दिग्दर्शकांनी त्यांच्याकडून कामही चांगलं करून घेतलं होतं. पण मला वाटतं, प्रेक्षकांना क्रिकेटरांकडून धावा काढण्याची आणि विकेट मिळवण्याचीच अपेक्षा असते. त्यांचं व्यक्तिमत्व कितीही चांगलं असलं तरी प्रेक्षक त्यांना नायिकेबरोबर रोमांस करताना आणि खलनायकासमवेत हाणामारी करताना पाहू शकत नाहीत. हे त्यांच्या इच्छेविरुद्ध असतं. एखाद्याची जी इमेज बनते त्याच इमेजमध्ये त्याला पाहण्यास प्रेक्षकांना आवडतं. पण सुनील शेट्टीने मात्र अजय जाडेजा, विनोद कांबळी आणि मोहिंदर अमरनाथला चित्रपटात येण्यास प्रवृत्त केलंय. त्याचं म्हणणं, 'जुनी गोष्ट

आता विसरा. आज प्रेक्षकांना प्रत्येक चित्रपटात काहीतरी नवं हवंय. या तीन क्रिकेटरसोबत मला काम करायला मिळतंय. हे माझं नशीव आहे. ते खरोखर प्रतिभावंत आहेत. तसंही आज इलेक्ट्रॉनिक माध्यमामुळे ॲक्टर आणि क्रिकेटर जवळ आलेत. आज तुम्ही एखादा चित्रपट टीव्हीवर पाहत असाल तर जाहिरातींमुळे अर्धाअधिक वेळ क्रिकेटरांचंच दर्शन होत असतं. त्यामुळे मला वाटतं की क्रिकेटरही चांगले ॲक्टर होऊ शकतात.'

मोठ्या पडद्यावरोबरच छोट्या पडद्यावरही क्रिकेटर येत आहेत. क्रिकेटपासून अलिप्त झाल्यानंतर फलंदाज सलील अंकोलानेही *चाहत और नफरत* या टीव्ही मालिकेत आपला अभिनय दाखवण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर *कोरा कागज*, *लेकिन वो सच था* आणि *नूरजहाँ* नावाच्या मालिकेत अभिनय प्रतिभा दाखवलीय. क्रिकेटर मनोज प्रभाकरनीही आपण चांगले गायक आहोत, हे सिद्ध केलंय. दोन वर्षांपूर्वी त्याचा ऑडिओ संगीत अलवम प्रसिद्ध झालाय. अधिकारी बंधूंची मालिका *वक्त की रफ्तार*मध्ये मनोज प्रभाकर अभिनय करणार आहे, अशी बातमी आली होती. पण काही कारणाने ते जमलं नाही. पण कधी ना कधी तो अभिनय करणारच. गाजावाजा झाल्यावर बऱ्याच दिवसांनी का होईना अजय जाडेजाने चित्रपटात प्रवेश करून इतर क्रिकेटरांना विचार करण्यास प्रवृत्त केलंय की, क्रिकेट जगतानंतर त्यांना चित्रपट जगत खुणावतंय. अजय जाडेजा या चित्रपटात नायकाची भूमिका करतोय. आणि त्याची नायिका आहे ऊर्मिला मातोंडकर. निर्माता पग्मा सिंधूना वाटतंय की, 'अजय आणि सुनील शेट्टीचा हा चित्रपट हिंदी चित्रपटात रेकॉर्ड करील. तो नक्कीच हिट होईल. कारण अजय या चित्रपटासाठी फार मेहनत घेतोय. त्याच्या भूमिकेबाबत तो फार गंभीर आहे.' सचिन तेंडुलकरचा मित्र विनोद कांबळीलाही ग्लॅमरस जीवन आवडतं. रवी दिवाणच्या *अनर्थ*मध्ये विनोद कांबळी कोणती भूमिका करतोय, त्यांनी विनोदकडून काय अपेक्षा ठेवल्यात याबाबत रवी दिवाण म्हणतात, 'विनोद कांबळी खरोखरच मेहनती आहे. या चित्रपटात विनोद सुनील शेट्टीचा खास मित्र आहे. आणि इमोशनल रोल करतोय. आमचं पंधरा दिवसांचं शेड्यूल आहे.'

पूर्वी चित्रपटांच्या क्रिजवर आलेले क्रिकेटर वाद झाले. पण आता चित्रपटाच्या मैदानात त्यांची कारकीर्द बहरते का ते पाहू.

□ राघव शास्त्री





आम्ही यशस्वी होऊ - अजय जाडेजा

□ या चित्रपटात तुझी भूमिका काय आहे?

– या चित्रपटात दोन मित्रांची कथा आहे. सुनील शेट्टी माझा मित्र असतो. माझी भूमिका सकारात्मक आहे. ज्यात रोमान्स, ॲक्शन आणि इमोशन 'सारं काही' आहे.

□ कॅमेऱ्यासमोर जाण्याआधी काही तयारी करतोयस?

– होय, ॲक्टिंगचे क्लासेस जॉईन करतोय. डान्स आणि ॲक्शन शिकतोय.

□ या चित्रपटात तुझी क्रिकेटरची इमेज लक्षात घेतलीय का?

– नाही! या चित्रपटात मी बॉलिंग, बॅटिंग आणि फिल्डिंगही करणार नाही. या अडीच तासाच्या चित्रपटात क्रिकेटचं अजिबात दर्शन होणार नाही.

□ सुनील आणि ऊर्मिलामध्ये तू, अशी प्रेम त्रिकोणाची तर कथा नाही ना!

– नाही. या चित्रपटात सुनील माझा मित्र बनलाय. त्यानंतर या नात्यात काय बदल होतो हे मी नाही सांगणार.

□ ऊर्मिलाशी रोमान्स करण्याच्या रोमांचक अनुभवाची वाट पाहतोस?

– कोण पाहणार नाही? ती सुंदर आहे आणि चांगली अभिनेत्रीही आहे. पण हा रोमान्स फक्त कॅमेऱ्यासमोर होईल. तुम्ही त्याचा मसाला बनवू नका.

□ पण तू कधीपर्यंत या मसाल्यापासून वाचवणार आहेस. तशी तुझी प्रतिमा दिलफेक तरुणासारखी बनलीय.

– ही तर मीडियाची मेहेरबानी आहे. ज्यांनी माधुरी दीक्षित, तब्बू आणि शिल्पा शेट्टीशीही माझं नाव जोडलं. मी मीडियाचा आभारी आहे. प्रसिद्धी माध्यमांनी माधुरीशी तर माझा विवाहही लावला होता.

□ इंडस्ट्रीत येण्याआधीच अशा गोष्टी ऐकून कसं वाटतं?

– बरं वाटतं. मजा येते. माधुरीसारख्या हिरोईनबरोबर ज्याचं नाव जोडलं जाईल तो नशीबवानच म्हणायचा.

□ तुझ्या वैवाहिक जीवनात अडथळे येत नाहीत?

– माझी पत्नी अदिती फार समजूतदार आहे. तिला खरं काय खोटं काय चांगलं कळतं.

□ कोणत्या खास हिरोईनबरोबर काम करायला आवडेल?

– सर्वांबरोबर. सर्व चांगली माणसं आहेत.

□ तू अभिनयाला फूल टाईम करिअर बनवलंयस?

– नाही, माझं पहिलं प्रेम क्रिकेट आहे. मी निर्दोष सिद्ध झाल्यावर पुन्हा फलंदाजी करण्यास उत्सुक आहे. चित्रपटाला मी पार्ट टाईम समजतो.

□ अजूनपर्यंत कोणताही क्रिकेटर चित्रपटात यशस्वी झालेला नाही.

– आम्ही यशस्वी होऊन दाखवू. ●